कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
टोल फ्री क्रमांक - 1064
कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

## :: प्रेस नोट ::

दिनांक :- 10.03.2021.

**जिल्हा कोषागार कार्यालय, जालना येथील उपलेखापाल श्री. सुंदरराव पुंजाजी वाहुळकर यांना 1,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. सुंदरराव पुंजाजी वाहुळकर, वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी, उप लेखापाल जिल्हा कोषागार कार्यालय, जालना रा. समर्थ एसटीडीजवळ, जमुनानगर जालना मुळ रा. कोडी कारला ता.जि. जालना (वर्ग - 3 ) |
| 2 | गुन्हा घ ता व ठि | :- | दि- 10.03.2021 रोजी अंबड चौफुली वर जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 1,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे वडील जुलै 2020 मध्ये जिल्हा परीषद जालना येथुन सेवानिवृत्त झाले असुन, त्यांनी मागील सात महिन्यांपुर्वी जिल्हा कोषागार कार्यालय, जालना येथे वडीलांचे सेवानिवृत्ती नंतर मिळणारे गट विमा योजनेचे (GIS) रक्कम 37,281/- रुपये मंजुर करुन देण्यासाठी अर्ज दिला होता, सदरचे अर्जावरुन त्यांचे वडीलांचे गट विमा योजनेचे (GIS) रक्कम 37,281/- रुपये मंजुर करुन देण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयातील उपलेखापाल श्री. सुंदरराव वाहुळकर यांनी तक्रारदार यांचेकडे 1,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदारास उपलेखापाल श्री. सुंदरराव वाहुळकर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि. 10.03.2021 रोजी पडताळणी केली असता उपलेखापाल श्री. सुंदरराव वाहुळकर यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे वडीलांचे गट विमा योजनेचे (GIS) रक्कम 37,281/- रुपये मंजुर करुन सदर रकमेचा धनादेश देण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले. तसेच आज दि. 10.03.2021 रोजी आलोसे उपलेखापाल श्री. सुंदरराव वाहुळकर यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांचे वडीलांचे गट विमा योजनेचे (GIS) रक्कम 37,281/- रुपये मंजुर करुन सदर रकमेचा धनादेश देण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्विकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने लक्की ज्युस सेंटर, नुतन वसाहत रोडवर अंबड चौफुलीजवळ, जालना येथे रंगेहाथ पकडले.

लोकसेवक श्री. सुंदरराव पुंजाजी वाहुळकर, वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी, उप लेखापाल जिल्हा कोषागार कार्यालय, जालना रा. समर्थ एसटीडीजवळ, जमुनानगर जालना मुळ रा. कोडी कारला ता.जि. जालना (वर्ग - 3 ) यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग,जालना.